# संत भक्तराज महाराज यांचे चरित्र : खंड १
# संत भक्तराज महाराज यांचे बालपण ते शिष्यावस्था

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


– ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ५
– संत भक्तराज बिरुदावली ६
– संत भक्तराज महाराज यांच्या चरित्राची आवश्यकता ७


**प्रकरण**


१. 'संत भक्तराज महाराज यांचे चरित्र' या ग्रंथमालिकेचे सामायिक मनोगत ८
२. नर्मदे हर हर हर । २६
३. बालपण ते नोकरी-धंदापर्व २८
४. कौटुंबिक जीवन ३६
५. गुरुप्राप्तीपूर्वीची साधना ५८
६. गुरुपरंपरा आणि गुरुकुल ६४
७. शिष्य दिनू ८८
८. ग्रंथाच्या संदर्भातील अनुभूती १३६

## प्रकरण १
## ‘संत भक्तराज महाराज यांचे चरित्र’
## या ग्रंथमालिकेचे सामायिक मनोगत


– पहिल्या आवृत्तीचे मनोगत ९

१. अमृतदिन ९
२. चरित्रलिखाणाचा विचार ९
३. इतिहास नव्हे, चरित्र ९
४. पूर्वायुष्य लिहायचे कि नाही ? १०
५. स्वभावदोषांविषयी लिहायचे कि नाही ? १३
६. पद्य कि गद्य ? १४
७. अडचण : बाबांविषयी माहिती न मिळणे १४
८. प्रमुख अडचण : लिखाणाची स्फूर्ती न होणे आणि तिचे निराकरण १६
९. ग्रंथाचे नाव १७
१०. चरित्रलेखनाची पद्धत १७
११. या चरित्रलेखनाविषयीचा आमचा अनुभव १८
१२. स्वचरित्राविषयी बाबांचे विचार १८
१३. चरित्र लिहिणाऱ्या संकलकांचे बाबांनी टीकेपासून रक्षण करणे १८
१४. लेखक नव्हे, तर संकलक १९
१५. आभार १९
१६. अपूर्ण २०
१७. श्री भक्तराजाय नमः । २०
– दुसऱ्या आवृत्तीचे मनोगत २४
– प्रकरण २ नर्मदे हर हर हर । २६

## प्रकरण ३
## बालपण ते नोकरी-धंदापर्व


१. जन्म आणि बालपण २८

२. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ३०

३. शालेय जीवन ३१

४. नोकरी-धंदापर्व ३१

    ४ अ. इंदूर परिसर ३२

    ४ आ. मुक्काम पोस्ट पुणे ३३

    ४ इ. मुंबईतील प्रयत्न ३३

    ४ ई. पुनश्च इंदूर ३४

    ४ उ. शेवटचा धंदा ! ३५


## प्रकरण ४
## कौटुंबिक जीवन


१. जीजी (गुरुपत्नी) ३६

    १ अ. बालपण ३६

    १ आ. विवाह ३७

    १ इ. संसाराची परवड ३९

    १ ई. स्वभाव ४३

    १ उ. जीजी आणि बाबा यांची भांडणे ४५

    १ ऊ. आध्यात्मिक जीवन ४७

२. मुले आणि बाबा ४८

    २ अ. महत्त्वाच्या घटना ४८

    २ आ. मुलांच्या बाबांविषयीच्या भावना ५३

३. घरातील लग्नकार्ये आणि बाबा ५४

४. बाबांचा कुटुंबियांकडे पहाण्याचा दृष्टीकोन ५६

५. नातेवाईक आणि बाबा ५६

## प्रकरण ५

## गुरुप्राप्तीपूर्वीची साधना

१. श्री गुरुचरित्र ५८
२. श्री श्यामसाईंचे मार्गदर्शन ५९
३. श्री साईबाबांचे मार्गदर्शन ६२

## प्रकरण ६

## गुरुपरंपरा आणि गुरुकुल

१. श्रीमत्परमहंस चंद्रशेखरानंद ६५
१ अ. ओंकारेश्वरानंद ब्रह्मचारी ६७
१ अ १. प.पू. आशाबाई ६७
२. प.पू. श्री अनंतानंद साईश ६८
२ अ. बालपण ते नोकरी ६८
२ आ. सत्संगाची आवड ६८
२ इ. नोकरीचा त्याग ६९
२ ई. गुरुप्राप्ती ६९
२ उ. साधना ७०
२ ऊ. दैनंदिन जीवन ७०
२ ए. व्यक्तीमत्त्व ७१
२ ऐ. गुरुरूप ७२
२ ओ. सिद्धी ७४
२ औ. प.पू. कोटावालेबाबा आणि प.पू. श्री अनंतानंद साईश ७५
२ अं. देहत्याग ७५
२ क. शिष्य ७५
२ क १. प.पू. भुरानंदबाबा ७६
२ क २. प.पू. श्रीराम पंडित ८५
३. प.पू. भक्तराज महाराज (दिनकर) ८५
३ अ. दिनकरला प.पू. श्री अनंतानंद साईश यांचे दर्शन होण्याची पूर्वपीठिका ८५

३ आ. दिनकर आणि श्री साईश यांच्यातील दुवा – पीरबाबा ८६

## प्रकरण ७

## शिष्य दिनू

१. गुरुदर्शन ते गुरूंचा देहत्याग ९०
१ अ. गुरुदर्शनाची पार्श्वभूमा ९०
१ आ. श्री साईबाबांच्या दर्शनाचा निश्चय ९०
१ इ. निश्चयपूर्तीचे प्रयत्न ९०
१ ई. गुरूंचे प्रथम दर्शन ९१
१ उ. वेडा दिनकर ९२
१ ऊ. गुरुमंत्र ९४
१ ए. 'भक्तराज' नामकरणविधी ९५
१ ऐ. गुरुसेवा ९६
१ ओ. दिनकरकडे बघण्याच्या इतरांच्या दृष्टीकोनात बदल ९६
१ औ. 'गुरूंची' परीक्षा ९६
१ अं. द्रष्टेपण ९७
१ क. धंद्याचा शेवट ९७
१ ख. श्री गुरूंचा देहत्याग ९८
१ ख १. आधीचा आजार ९८
१ ख २. सर्वांचा निरोप घेणे ९९
१ ख ३. देहत्यागाचे वृत्त रामजीदादाला कळणे १००
१ ख ४. देहत्यागाचे वृत्त भुरानंदाला कळणे १००
१ ख ५. देहत्यागाचे वृत्त दिनकरला कळणे १०१
१ ख ६. शेवटचा विधी १०१
१ ख ७. गुरूंचे नाव कळणे १०२
१ ख ८. भक्तराजांवर दायित्व १०२
२. इतर गुरुरूपांत गुरु १०२
२ अ. प.पू. दत्तबाबा १०२
२ आ. पितृतुल्य १०८ श्री ज्ञानगिरी महाराज १०३

२ इ. पूर्णपुरुषोत्तमाचार्य ११०
३. आदर्श शिष्य ११५
३ अ. अडचणी ११५
३ अ १. कौटुंबिक अडचणी ११५
३ अ २. हितचिंतकांकडून अडचणी ११६
३ अ ३. सामाजिक अडचणी ११६
३ आ. तळमळ ११७
३ इ. गुरूंवरील भक्ती आणि श्रद्धा ११७
३ ई. गुरूंविषयी भाव १२०
३ उ. गुरुमंत्र १२१
३ ऊ. नम्रता १२२
३ ए. सेवा १२२
३ ऐ. आज्ञापालन १२५
३ ओ. भ्रमिष्टावस्था १२७
३ औ. परीक्षा १२९
३ अं. गुरूंनी शिकविणे १३०
३ अं १. वागण्यातून शिकवणे १३१
३ अं २. अनुभूतींतून शिकवणे १३२
३ क. गुरूंनी केलेले कौतुक आणि आशीर्वाद १३४
३ ख. गुरूंविषयी खात्री १३५
३ ग. प्रार्थना १३५
३ घ. पूर्णत्व १३५

**– प्रकरण ८. ग्रंथाच्या संदर्भातील अनुभूती १३६**

# मनोगत

## पहिल्या आवृत्तीचे मनोगत

### १. अमृतदिन

भगवंताच्या अवताराची कथा तुम्हा सांगतो ।
गुरुकृपेच्या महतीची ती गाथा मी वर्णितो ।।

### २. चरित्रलिखाणाचा विचार

'प.पू. श्रीमत् सद्गुरु भक्तराज महाराज यांची शिकवण' हा आमचा ग्रंथ प्रकाशित झाल्यावर बऱ्याच जणांनी विचारणा केली, 'महाराजांचे चरित्र आहे का ?' त्यांना डॉ. विठ्ठल माधव पागे यांनी पुष्कळ परिश्रमपूर्वक माहिती जमा करून, वाङ्मयीन भाषेत लिहिलेले 'नाथ माझा भक्तराज' हे चरित्र उपलब्ध असल्याचे आम्ही सांगत असू. पुढे 'त्याच्या प्रती संपल्या आणि पुनर्मुद्रण करण्याचा विचार नाही', असे प्रकाशकांकडून कळल्यामुळे 'आता चरित्र वाचायला कसे द्यायचे', हा प्रश्न आला. आमच्या संस्थेच्या वतीने 'अध्यात्मशास्त्र' या विषयावरील अभ्यासवर्ग प्रत्येक महिन्याला ठिकठिकाणी घेतले जातात. त्या वर्गांची आणि त्यांना उपस्थित रहाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने अन् संस्थेच्या कार्यामागची प्रेरणा प.पू. भक्तराज महाराज यांची असल्याचे आम्ही सांगत असल्याने चरित्राची मागणी सतत वाढत होती. त्या सर्व जिज्ञासूंना 'चरित्र उपलब्ध नाही', असे सांगणे महाराजांचा शिष्य म्हणूनही जिवावर येत होते. त्यातच भर म्हणून ३०.११.१९६२ या दिवशी महाराजांचे पट्टशिष्य प.पू. रामानंद (त्या वेळचे श्री. रामजीदादा निरगुडकर) यांना लिहिलेल्या पत्रात महंत १०८ श्री ज्ञानगिरी महाराज यांनी बाबांचे चरित्र लिहिण्याची आवश्यकता प्रतिपादन केल्याचेही वाचनात आले. ती पत्रे ग्रंथारंभीच दिली आहेत. शेवटी ठरवले की, आपणच चरित्र लिहायचे.

### ३. इतिहास नव्हे, चरित्र

'चरित्र' हा शब्द 'चर्-चरति' या धातूपासून बनला आहे. त्यापासूनच 'आचरण' हा शब्द बनला आहे; म्हणून बाबांचे आचरण कसे होते आणि आहे, त्यातून साधकांना काय शिकता येईल, या दृष्टीने चरित्र लिहायचे, असे आम्ही ठरवले. अशा चरित्रात इतिहासाला, म्हणजे कोणत्या दिवशी, कोणत्या ठिकाणी अमुक एक प्रसंग घडला, तेव्हा कोण उपस्थित होते, याला अर्थातच गौण स्थान

असणार होते. 'इतिहास' हा शब्द 'इति (म्हणजे असे) + ह (म्हणजे हे) + आस (म्हणजे घडले)' अशा तऱ्हेने बनला आहे. तो मुख्यतः स्थुलातील घडामोडींच्या संदर्भात असतो. अध्यात्म हा विषय सूक्ष्माचा असल्याने स्थुलातील तपशिलांना अल्प महत्त्व द्यायचे आम्ही ठरवले. थोडक्यात म्हणजे, 'आपण एका सद्‌गुरूंचे चरित्र लिहीत आहोत. गुरु म्हणजे शिष्याला मार्गदर्शन करणारे, आशीर्वाद देणारे तत्त्व; म्हणून चरित्रातील जास्तीतजास्त भाग शिष्यांना आणि साधकांना उपयुक्त होईल असा लिहायचा', असे ठरवून आम्ही हे चरित्र लिहिले आहे.

## ४. पूर्वायुष्य लिहायचे कि नाही ?

'स्थुलातील विषयाला महत्त्व द्यायचे नाही', असे ठरवले, तरी 'येथे सर्व आहे, पाहिजे ते आणा', या महाराजांच्या वचनाची आठवण झाली. महाराजांना आम्ही 'बाबा' म्हणतो. 'येथे, म्हणजे या चरित्रात, सर्व माहिती आहे', असे निरनिराळ्या पातळीच्या साधकांना वाटले पाहिजे. ज्यांना जे पाहिजे, ते चरित्रात मिळाले, तरच त्यांच्यात विश्वास आणि श्रद्धा निर्माण होऊन ते 'पाहिजे ते आणतील', म्हणजे साधना करतील, असे वाटले.

सर्वसाधारण व्यक्तीची पातळी २० टक्के आणि मोक्ष म्हणजे १०० टक्के असे धरले, तर सर्वसाधारणतः २० टक्के पातळीच्या व्यक्तीला अध्यात्मविषयक वाचनाची आवड नसते. समाजात बहुसंख्य तेच असतात. ३० टक्के पातळीच्या साधकाला संतांच्या स्थूलदेहाच्या चरित्रात रस असतो, म्हणजे संत दिसतात कसे, त्यांचे लहानपण, शिक्षण, व्यवसाय, कुटुंबीय इत्यादी गोष्टींत रस असतो. ३५ टक्के पातळीच्या साधकाला त्यांनी गुरुसेवा कशी केली, त्यांच्या भावनेचे भावात कसे रूपांतर झाले, अशा माहितीची, म्हणजे सूक्ष्मदेहाच्या (मनोदेहाच्या) चरित्राची आवड असते. ४० टक्के पातळीच्या साधकाला त्यांचे तत्त्वज्ञान, शिकवण समजून घेण्याची ओढ असते, म्हणजेच त्याला कारणदेहाच्या चरित्राची ओढ असते. ५५ टक्के पातळीच्या पुढील साधकाला 'जीवात्म्याच्या अनुभूती आणि त्यांचे शास्त्र, हे समजून घ्यावे', असे वाटते. अर्थात साधकाच्या मार्गाप्रमाणे यात पालटही होतो. साधक-वाचकांपैकी जवळजवळ ४० टक्के साधकांना स्थूलदेहाच्या, ३० टक्के साधकांना सूक्ष्मदेहाच्या, २० टक्के साधकांना कारणदेहाच्या आणि १० टक्के साधकांना जीवात्म्याच्या अनुभूतींच्या शास्त्राच्या संदर्भात माहिती मिळावी, अशी इच्छा असते. बऱ्याच जणांच्या इच्छेनुसार आणि आवश्यकतेनुसार बाबांच्या स्थूल-देहाविषयीचा भागही चरित्रात घेणे आवश्यक आहे, असे वाटल्याने तोही घेतला आहे.

त्याच वेळी श्री. वि.मा. पागे यांनी लिहिलेल्या पुढील ओळी आठवल्या. 'श्री गुरूंच्या सेवेचे साधकाच्या जीवनातील अनन्य महत्त्व समजून घेणे, हे अधिक मोलाचे आहे. त्यामुळे प.पू.

भक्तराजांच्या पूर्वजीवनातील प्रापंचिक प्रसंगांना या चरित्रात मुळीच स्थान मिळू नये, ही सद्‌गुरूंची इच्छा शिरोधार्य मानून त्यांच्या आध्यात्मिक जीवनाच्या उषःकाली सद्‌गुरुराजरूपी चित्सूर्य कसे उदयाला आले, ते पाहू.' त्यात भर म्हणून कि काय, कोणीतरी असेही सांगितले की, एकाने बाबांच्या पूर्वायुष्याविषयी लिहिलेली ४० पाने बाबांनी फाडून टाकली होती.

या पार्श्वभूमीवर 'बाबांना त्यांचे गुरु भेटण्याआधीचा काळ चरित्रात कसा घ्यायचा', असा संभ्रम मनात निर्माण झाला. मग विचार आला, 'नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ शोधू नये' अशी म्हण असली, तरीही वाल्मीकिऋषी पूर्वायुष्यात वाल्या कोळी होते, हा प्रसंग पुस्तकात असतोच. गुरु भेटल्यानंतर बाबांचा एक प्रकारे पुनर्जन्म झाला असला, तरी 'रामायण' आणि 'महाभारत' यांतील प्रमुख व्यक्ती मागच्या जन्मी कोण होत्या, हेही जर पुस्तकात दिलेले असते, तर बाबांच्या पूर्वायुष्याविषयी माहिती देण्यात वावगे काय, असे वाटले. ईश्वराचा एक गुण 'लीलाचरित्रे आवडणारा' हा आहे. जर त्यालाही लीलाचरित्रे आवडतात, तर बाबांसारख्या अवतारी संतांच्या लहानपणापासूनच्या लीला वाचायला कोणाला आवडले, तर त्यात काय चूक आहे ? त्यात आणखी एक लाभही आहे आणि तो म्हणजे, 'बाह्यतः सर्वसाधारणपणे असते, तसे बालपण, तारुण्य, आर्थिक स्थिती, विवाह इत्यादी असतांना जर एखादा साधना करून अध्यात्मात सर्वोच्च प्रगती करू शकतो, तर आपणही प्रयत्न करून पाहूया', असा विचारही काही जणांच्या मनात येऊन ते साधना करण्याची शक्यता आहे.

बाबांच्या पूर्वायुष्याविषयी लिहिलेले बाबांना आवडत नाही आणि आपल्याला तर लिहावेसे वाटते, मग करायचे तरी काय, या संभ्रमात असतांना पुढील बालीश विचार मनात आला. 'प.पू. श्रीमत् सद्‌गुरु भक्तराज महाराज यांची शिकवण' हा ग्रंथ प्रकाशित करण्याआधी त्याचे हस्तलिखित बाबांना दाखवले होते. त्यातील सर्व भाग त्यांनी स्वतः किंवा प.पू. रामजीदादा यांनी वाचला होता. 'लिहिलेले बरोबर आहे', असे त्यांनी म्हटल्यावरच ग्रंथ छापला होता. या वेळी तसे न करता 'हस्तलिखित बाबांना न दाखवताच ग्रंथ छापायचा, सर्वांना द्यायचा आणि नंतर तो बाबांना दाखवायचा', असे ठरवले. ग्रंथ आधीच सर्वत्र दिला की, मग बाबांनी 'त्यातील पूर्वायुष्याविषयी लिहिलेली पाने फाडा', असे सांगितले, तरी वाचकांकडे असलेल्या प्रतींत ती पाने रहातील. फक्त साठ्यातील प्रतींमधील पाने काढून टाकावी लागतील', असे वाटले. या विचारामुळे मनाला बरे वाटले. 'गुर्वाज्ञा न मोडता पूर्वायुष्य इतरांपर्यंत पोहोचेल', असे वाटले. ही पळवाट बुद्धीच्या पातळीला ठीक असली, तरी शिष्य आणि साधक म्हणून कशी चुकीची आहे, हे पुढे दिलेल्या विचारांमुळे नंतर लक्षात आले.

१. पूर्वायुष्यावर लिहावे, या विचाराचे कर्तेपण स्वतःकडे घेतल्यामुळे मनात विकल्प निर्माण झाले.

'बाबांनीच हा विचार सुचवला आहे. त्याप्रमाणे करायचे', असे ठरवले असते, तर हा प्रश्नच आला नसता.

२. गुरु सर्वज्ञ आणि सर्वशक्तीमान असतांना त्यांच्या नकळत आपण काही करू शकू, हा विचारच वेडेपणाचा होता. लिखाण अयोग्य वाटले असते, तर त्यांना ते कधीही थांबवता आले असते.

पूर्वायुष्याविषयी लिहावे, याला बाबांचा आशीर्वादच आहे, हे पुढील घटनेवरून सिद्धही झाले. बाबांचे भाचे श्री. पुरुषोत्तम माधवराव जोशी हे बाबांनी सांगितले म्हणून त्यांच्या एका कामाच्या संदर्भात ४ सप्टेंबर १९९४ या दिवशी मुंबई येथे आम्हाला भेटण्यास आले होते. बोलण्याच्या ओघात चरित्राचा विषय निघाला. 'पूर्वायुष्य लिहावेसे वाटते; पण त्याची माहिती उपलब्ध नाही आणि कोणी सांगत नाही, बाबांना ती माहिती लिहिलेली आवडत नाही, तरीही छापणार' इत्यादी आम्ही सांगितल्यावर ते लगेच म्हणाले, "पूर्वायुष्यातील माहिती चरित्रात लिहायलाच पाहिजे. त्यामुळे जे हे चरित्र वाचतील, त्यांना कळेल की, एक साधारण व्यक्ती कशी थोर संतपदाला पोहोचते. गुरुप्राप्तीनंतरच्या आयुष्याइतकेच पूर्वायुष्यही मजेदार आणि शिकण्यासारखे आहे. दुनियादारी करत ईश्वराशी समरस कसे व्हायचे, ते वाचणाऱ्याला कळेल. समाजापुढे एक उदाहरण होईल की, जगाचे व्यवहार करूनही माणसाने ईश्वरभक्ती कशी करावी. मी इंदूरला परत गेलो की, आठवड्याभरात मला आठवते ते सर्व लिहून पाठवून देतो." १३-१४ तारखेपर्यंत त्यांच्याकडून लिखाण न आल्याने आणि 'आम्ही माहिती नक्की लिहून देतो', असे आश्वासन देऊन ते न पाळणाऱ्यांचा अनुभव आतापर्यंत आलेला असल्याने आम्ही तो विचार मनातून काढून टाकला. २८ सप्टेंबर १९९४ या दिवशी इंदूरला वैकुंठदेवयागाच्या निमित्ताने गेलो असता चार दिवस तेथे होतो. तेथेही श्री. जोशी यागाला आले नाहीत; म्हणून त्यांच्या घरी जाऊन आलो, दूरध्वनी केले, तरीही त्यांची भेट होऊ शकली नाही. इंदूरहून परतण्याच्या दोन घंटे आधी ते आले आणि म्हणाले, "२५ सप्टेंबर १९९४ या दिवशी रात्री मला स्वप्न पडले की, मी माझ्या पलंगावर बसलो आहे. महाराज स्वतः आश्रमातून मला माझ्या घरी दूरध्वनी करतात आणि आठवण देतात, 'डॉ. आठवले इंदूरला येणार आहेत. आठवण आहे ना ?' त्या वेळेस मला वाटले की, महाराज आठवण देत आहेत, 'तुला त्यांना लिहून द्यायचे आहे, हे लक्षात आहे ना ?' त्यापूर्वी मी लक्षात असूनही कामाच्या अतीव्यग्रतेमुळे आणि आजारपणामुळे लिहू शकलो नव्हतो; पण नंतर मी ताबडतोब 'शॉर्टनोट' तयार केली. ती सविस्तर लिहून एका आठवड्यात पाठवतो." परत काही आठवडे गेले. लिखाण न आल्याने आम्ही पुन्हा आशा सोडली. शेवटी २४ ऑक्टोबर १९९४ या दिवशी श्री. जोशी मुंबईला लिखाण घेऊन आले. त्यात पूर्वायुष्याबद्दल १०-१२ नवीन सूत्रे (मुद्दे) होती. ती या चरित्रात घेतली आहेत. त्यांच्या लिखाणात पुढील सूत्रही होते, 'यात काही ईश्वरी हेतू असावा, असे मला वाटत आहे ! माझे मुंबईला

येणे, आपणांस भेटणे, चरित्राविषयी गोष्टी होणे, हा सर्व ईश्वरी योगच असावा, असे मला वाटते.' जोशींच्या स्वप्नदृष्टांताने तर आमची खात्रीच पटली की, पूर्वायुष्यातील काही भाग चरित्रात येणे बाबांनाच योग्य वाटत आहे आणि त्यानुसार तो भाग आम्हाला कळेल, अशी व्यवस्थाही ते करत आहेत. मग निःशंक मनाने आणि उत्साहाने आम्ही तो भाग लिहू शकलो.

## ५. स्वभावदोषांविषयी लिहायचे कि नाही ?

बाबांच्या, म्हणजे आमच्या गुरूंच्या रागीटपणा, शिव्या देणे, उधळेपणा, उतावळेपणा इत्यादी बाह्यतः वाटणाऱ्या स्वभावदोषांविषयी आपण लिहिले, तर ते योग्य होईल का, इतरांना आपल्या गुरूंविषयी काय वाटेल, आधीच नास्तिक असलेल्या काही जणांना अध्यात्मापासून आणखी दूर लोटायला आपण कारणीभूत तर ठरणार नाही ना, अशा प्रकारचा कुठलाच विचार मनात आला नाही. 'जे काही सुचले, ते बाबाच सुचवतात; म्हणून आपण त्याच्या योग्यायोग्यतेविषयी विचार करायचा नाही', असा मनाचा निश्चय होता. दुसराही एक विचार मनात होता तो म्हणजे, 'आपण अध्यात्मशास्त्राचे अभ्यासक आहोत. तेव्हा शास्त्रात जे आहे, तसे लिहायचे असते.' त्यामुळे 'बाह्यतः बरे-वाईट वाटणारे जे काही असेल, ते सर्व लिहायचे', असेही ठरवले.

## ६. पद्य कि गद्य ?

चरित्र लिहायचे ठरवल्यावर 'ते पद्यात लिहावे कि गद्यात', हा प्रश्न आमच्या मनात निर्माण झाला. जुन्या काळातील अध्यात्मातील बहुतेक सर्व लिखाण पद्याच्या गेयतेमुळे आणि नादशक्तीमुळे पद्यात आहे. आपल्याला तर पद्यात लिहिता येत नाही. आता काय करायचे, हा प्रश्न मनात उभा राहिला. बाबांनी तोही प्रश्न कसा सोडवला, ते पुढे दिलेल्या मुद्दा '१७'मधील ओवीबद्ध रचनेतून स्पष्ट होईल. थोडक्यात, आपल्या शिष्याला हे येत नाही, ते येत नाही, असे बाबा कधीही होऊ देत नाहीत. जे जे त्याच्यात न्यून असेल, त्याची पूर्ती करतात, याचे हे उदाहरण आहे.

## ७. अडचण : बाबांविषयी माहिती न मिळणे

चरित्र लिहिण्याचे आणि ते कसे लिहायचे, ते ठरवले. हा भाग सोपा होता; पण त्यासाठी माहिती जमवणे किती कठीण आहे, हे माहिती जमवायला प्रारंभ केल्यावरच कळले. बाबा स्वतःहून चरित्रासाठी विशिष्ट माहिती सांगत नव्हते. बाबांनी बोलण्याच्या ओघात सांगितलेली माहिती गेल्या चार-पाच वर्षांत आम्ही लिहून ठेवली होती. तिचा बराच उपयोग झाला. बाबांची वर्षानुवर्षे सेवा केलेल्या किंवा बाबांचा सहवास अधूनमधून का होईना; पण काही वर्षे लाभलेल्या शिष्यांकडून

माहिती मिळावी, म्हणून बरेच प्रयत्न केले; पण त्यांतील फक्त गुरुवासी हरिभाऊ लांभाते, श्री. शशिकांत पंडित, श्री. श्रीकांत पंडित आणि श्री. अशोक भांड यांनी सांगता येईल तेवढी माहिती सांगितली. प.पू. सौ. जीजी (बाबांच्या पत्नी) यांनीही काहीएक आढेवेढे न घेता माहिती सांगितली. वर सांगितल्याप्रमाणे बाबांचे भाचे श्री. पुरुषोत्तम माधवराव जोशी यांनी बाबांच्या लहानपणापासून ते संत होईपर्यंतच्या कालखंडातील माहिती सांगितली. बाकीच्यांनी पुढील कारणांसाठी माहिती सांगणे टाळले.

**७ अ. 'आम्ही काय माहिती सांगणार ? बाबा स्फूर्ती देतील, सुचवतील, तेव्हा आम्ही सांगू !' :** बाबांशी पूर्णपणे एकरूप झालेल्याने, म्हणजे ईश्वरेच्छेने दिवसभरातील सर्व व्यवहार करणाऱ्याने असे उद्गार काढले असते, तर ते समजण्यासारखे होते; पण जेवणे, फिरणे, बोलणे, इत्यादी सर्व गोष्टी स्वेच्छेने करणाऱ्यांनी फक्त हीच गोष्ट बाबांच्या इच्छेवर सोडली होती ! अर्थात हाही त्यांचा दोष नव्हता. त्यांना माहिती सांगण्याचे महत्त्व कळले नव्हते. साईबाबांची सेवा करणाऱ्या आणि त्यांच्यासमवेत छायाचित्रात दिसणाऱ्या सर्वश्री म्हाळसापती सोनार, काशीराम शिंपी अन् अप्पा जागले यांनी त्यांची माहिती लिहून ठेवली असती, तर आणखी कितीतरी गोष्टी साधकांना शिकायला मिळाल्या असत्या; पण त्यांनी न लिहिल्यामुळे ती माहिती काळाच्या उदरात गडप झाली. तसेच बाबांच्या शिष्यांनी माहिती न सांगितल्यामुळे होणार आहे; पण त्यावर काही उपाय नाही. बाबांची इच्छा !

**७ आ. टीकेची भीती :** आम्ही मागे डॉ. पागे यांना 'नाथ माझा भक्तराज'मध्ये छापण्यासाठी माहिती सांगितली आणि त्यावरून इतरांशी वाद झाला. काही जणांनी आमच्यावर टीका केली, असेही काही जण म्हणाले. त्यांच्या लक्षात आले नाही की, 'गुरुसेवा म्हणून आपण माहिती सांगत आहोत', असा भाव त्यांच्या मनात असता, तर इतरांच्या टीकेकडे त्यांना सहज दुर्लक्ष करता आले असते. दुसरे असे की, आपण सांगितलेल्या एखाद्या तपशिलात चूक असली आणि दुसऱ्याने ती सांगितली, तर त्याविषयी वाईट वाटण्याऐवजी 'बरे झाले चूक कळली. आता पुढील आवृत्तीत ती सुधारता येईल', असा दृष्टीकोन असला की, टीकेचे काही वाटत नाही.

**७ इ. अहंभाव वाढेल :** बाबांविषयी माहिती, तसेच अनुभूती सांगतांना त्यात स्वतःचा संदर्भ असल्याने अहंभाव वाढेल, असेही काही जणांना वाटले. 'आपण माहिती सांगत आहोत ती इतर साधकांना मार्गदर्शन व्हावे म्हणून, त्यांना काही शिकायला मिळावे म्हणून', असा भाव माहिती

सांगणाऱ्यात असेल, तर मग अहंभाव निर्माण होत नाही. 'मी असतांना बाबा असे म्हणाले', याऐवजी 'मी असतांना बाबा असे म्हणाले', हा दृष्टीकोन हवा.

या अडचणींमुळे बाबांकडून आम्ही ऐकलेली माहिती 'नाथ माझा भक्तराज' या डॉ. विठ्ठल माधव पागे यांनी लिहिलेल्या चरित्रातील माहिती आणि गेल्या सात वर्षांत निरनिराळ्या प्रसंगी आम्ही स्वतः उपस्थित असल्याने समजलेली माहिती यांच्या आधारावर हे चरित्र प्रामुख्याने लिहिले आहे.

**८. प्रमुख अडचण :** लिखाणाची स्फूर्ती न होणे आणि तिचे निराकरण एकूण चरित्रलिखाणाचा विचार केला, तर माहिती जमवण्यात आलेल्या अडचणी गौणच आहेत. २० ऑक्टोबर १९९४ पर्यंत प्रमुख अडचण होती, ती म्हणजे चरित्रलिखाणाची स्फूर्तीच होत नव्हती. अध्यात्मात आल्यावर हे शिकलो होतो की, स्फूर्ती झाल्याशिवाय नुसत्या बुद्धीने काही लिहायचे नाही; कारण त्या दोन लिखाणांत पुष्कळ भेद असतो. बाबांच्या ९ फेब्रुवारी १९९५ या दिवशी इंदूर येथे साजऱ्या होणाऱ्या अमृतमहोत्सवाला फक्त साडेतीन मास उरले होते, तरी लिखाणाला प्रारंभ होत नव्हता. अमृतमहोत्सवात चरित्र उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक होते. मात्र 'लिखाणासाठी साडेतीन मास होते', असे म्हणणेही चूकच होते; कारण त्यांतील शेवटचे पंधरा दिवस अमृतमहोत्सवाची सिद्धता करण्यासाठी आम्ही इंदूरलाच जाऊन रहाणार होतो. छपाईसाठी एक मासाचा अवधी छापखान्याला देणेही आवश्यक होते. रहाता राहिले अडीच मास. या अडीच मासांत बाबांच्या भजनांच्या ग्रंथांच्या मराठी आणि हिंदी आवृत्त्या छपाईसाठी सिद्ध करणे, 'संत भक्तराज महाराज यांची शिकवण' या ग्रंथाच्या मराठी अन् इंग्रजी भाषांतील सुधारित आवृत्त्या सिद्ध करणे, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांत अमृतमहोत्सवाच्या कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिका सिद्ध करणे, स्मरणिकेच्या विज्ञापनांचा (जाहिरातींचा) मसुदा सिद्ध करणे, स्मरणिकेसाठी लिखाण सिद्ध करणे, बिल्ले, महोत्सवाच्या ठिकाणी लावण्यासाठी सुवचने आणि भजने यांचे कापडी फलक, अमृतमहोत्सवासाठी इंदूर शहरात लावायचे मोठमोठे कापडी फलक, महोत्सवासाठी वसवल्या जाणाऱ्या नगराकरता लागणारी दारे, व्यासपिठावरील पडदा, बाबांच्या जीवनचरित्रावर आधारित चित्रे अन् छायाचित्रे यांचे प्रदर्शन, बाबांच्या भजनांच्या ध्वनीफिती आणि त्यांवरील छायाचित्रे इत्यादी सिद्ध करून घेणे, याखेरीज संस्थेच्या ठिकठिकाणी चालणाऱ्या अभ्यासवर्गांसाठी मार्गदर्शनात्मक सूत्रे सिद्ध करणे अन् इतर दैनंदिन कामे अशा कितीतरी गोष्टी करायच्या होत्या. या सगळ्या गोष्टी करतांना 'चरित्रलिखाणाला वेळ कसा मिळणार', याची काळजी या वेळी मात्र नव्हती. या आधी 'संत भक्तराज महाराज यांची शिकवण' हा ग्रंथ लिहितांना असाच अल्प वेळ होता आणि गुरुपौर्णिमेच्या सिद्धतेची धावपळ होती. तेव्हा खूप काळजी वाटत होती. बाबांनी तो ग्रंथ पूर्ण करून घेतला होता. तसाच हा ग्रंथही बाबा पूर्ण

करून घेतील, याची निश्चिती होती. या निश्चितीची बाबांनी पूर्तता केली. ‘अनंत चतुर्दशीच्या भंडाऱ्याला (१८ सप्टेंबर १९९४ या दिवशी) इंदूरला आला नाहीत, तरी चालेल. तुमची कामेच करा’, असे ६ सप्टेंबर १९९४ या दिवशी दूरध्वनीवरून बोलतांना बाबा म्हणाले होते. म्हणजे ‘लिखाणासाठी आम्हाला वेळ द्यायला हवा’, असे बाबांनाही वाटत होते तर ! इतर कामांत आणखी दीड मास कसा गेला, ते कळले नाही. १९ नोव्हेंबरला रात्री ठरवले की, बाबांची इच्छा नसली, तर चरित्र लिहायचे नाही. त्याचा विचारही करायचा नाही. विचार करायला इतर खूप कामे होतीच म्हणा ! २० नोव्हेंबरला सायंकाळी स्फूर्ती झाली आणि चार आठवड्यांत इतर सर्व कामांना प्राधान्य देऊनही चरित्राचे हस्तलिखित लिहून झाले !

## ९. ग्रंथाचे नाव

बाबा सद्‌गुरुपदावर आरूढ असतांना ग्रंथाच्या नावामध्ये ‘संत भक्तराज’ असे का लिहिले, असे काही जणांना वाटेल. त्याचे उत्तर असे की, दैनंदिन जीवनात बाबा ७० टक्के वेळा ‘गुरु’ म्हणून आणि ३० टक्के वेळा ‘संत’ म्हणून कार्य करत असले, तरी त्यांच्या गुरुपदाचा लाभ फारच थोडे जण घेतात. त्यांच्याकडे येणाऱ्या सहस्रो लोकांपैकी बहुतेक जण ‘संत’ म्हणूनच त्यांच्याकडे येतात. यासाठीच ग्रंथाच्या नावामध्ये ‘संत भक्तराज’ असे लिहिले आहे.

## १०. चरित्रलेखनाची पद्धत

‘अध्यात्म’ या विषयाकडे आम्ही ‘शास्त्र’ या दृष्टीने पहात असल्याने आणि हे चरित्र अध्यात्मातील एका अधिकारी व्यक्तीचे असल्यामुळे ते नेहमीच्या गोष्टीरूप भाषेत न लिहिता शास्त्रीय भाषेत लिहिले आहे.

ग्रंथात दिलेली बाबांची सुवचने ‘संत भक्तराज महाराज यांची शिकवण’ या ग्रंथातील आहेत, तर ग्रंथात ठिकठिकाणी दिलेल्या भजनपंक्ती बाबांच्या ‘भजनामृत’ या ग्रंथातून घेतलेल्या आहेत. भजनपंक्तींखाली दिलेले भजन क्रमांक हे ‘भजनामृत’ या ग्रंथातील आहेत. आणखी माहिती उपलब्ध झाल्यास तिचा पुढच्या आवृत्तीत समावेश करता येईल. तपशिलात असलेल्या चुका जाणकारांनी लक्षात आणून दिल्यास त्या पुढच्या आवृत्तीत सुधारण्यात येतील.

## ११. या चरित्रलेखनाविषयीचा आमचा अनुभव

चरित्र लिहून पूर्ण झाल्यावर मागच्या काही प्रसंगांची आठवण झाली. बाबांकडे गेल्यावर नेहमी काही प्रश्न विचारून आम्ही बाबांनी दिलेली उत्तरे लिहून घेत असू. बाबांना कोणी विचारले, ‘डॉक्टर

काय लिहून घेतात ?', तर बाबा उत्तर द्यायचे, 'डॉक्टर माझे चरित्र लिहीत आहेत.' तेव्हा आम्ही तिकडे दुर्लक्ष करायचो; कारण चरित्र लिहिण्याच्या कल्पनेपेक्षा अध्यात्मशास्त्रावरील लिखाणाची कल्पना आम्हाला जास्त योग्य वाटायची; कारण ती तत्त्वाविषयी आहे आणि ते तत्त्व अनादि अन् अनंत आहे. याउलट चरित्र एका व्यक्तीच्या संदर्भात आणि मर्यादित स्वरूपात असते. पुढे अनुभवास आले की, बाबा हे तत्त्वरूप असल्याने त्यांचे चरित्र हेही अध्यात्मशास्त्रावरील लिखाणाप्रमाणे आहे. बाबांचे गुरु त्यांना म्हणायचे, "अब तेरा धंदा चलता है या मेरा चलेगा, जरा देख तो !" शेवटी त्यांच्या गुरूंच्या इच्छेप्रमाणेच सर्व झाले. तसेच चरित्र न लिहिण्याचा आमचा विचार मोडून काढून बाबांनी त्यांच्या संकल्पाप्रमाणे ते आमच्याकडून लिहून घेतलेच.

## १२. स्वचरित्राविषयी बाबांचे विचार

'हे चरित्र माझे नाही. हे चरित्र प.पू. श्री अनंतानंद साइशांचे आणि माझ्या भक्तांचे आहे. त्यांच्या चरित्रात माझे चरित्र दडले आहे. माझे खरे चरित्र म्हणजे भजन', हे सूत्र पू. बाबा आरंभापासून म्हणत आले.' (२) हेच विचार बाबांनी आम्हाला परत ऐकवले. बाबांची भजने आणि त्याविषयीची सविस्तर माहिती 'भजनामृत' या ग्रंथात दिली आहे. तसेच बाबांची शिकवण 'संत भक्तराज महाराज यांची शिकवण' या ग्रंथात दिली आहे.

## १३. चरित्र लिहिणाऱ्या संकलकांचे बाबांनी टीकेपासून रक्षण करणे

डॉ. विठ्ठल माधव पागे यांनी पुष्कळ परिश्रम घेऊन बाबांचे 'नाथ माझा भक्तराज' हे चरित्र लिहिले. त्यावर क्षुल्लक मुद्यांवरून काहींनी टीका केली. "तशी टीका या चरित्रावर होऊ नये; म्हणून काय करावे ?", असे बाबांना विचारल्यावर त्यांनी चरित्रात पुढील सूत्र लिहायला सांगितले – 'हे लिखाण आमच्या आकलनाप्रमाणे केलेले आहे. साधकाच्या श्रद्धेप्रमाणे त्याला त्याचा वेगळा भावार्थ लावणे शक्य आहे. आध्यात्मिक लिखाणाचा अर्थ शेवटी साधकाच्या तयारीवर अवलंबून आहे. द्रोणाचार्यांच्या दोन शिष्यांनी (अर्जुन आणि एकलव्य) एकाच गुरूंकडून विद्या हस्तगत केली; पण दोघांचाही भाव वेगळा होता. तसेच हे आहे.'

## १४. लेखक नव्हे, तर संकलक

एक वेळ काल्पनिक लेखन करणारे कथा-कादंबरीकार 'लेखक' म्हणून स्वतःचे नाव लिहू शकतात; पण चरित्र लिहितांना लेखकाचे कार्य घडलेल्या घटना एकत्र संकलित करून लिहिणे एवढेच असते. हे झाले स्थुलाच्या, बुद्धीगम्य माहितीच्या संदर्भात. अध्यात्माच्या सूक्ष्म दृष्टीने विचार

करता बाबांनीच चरित्रलेखनाचा विचार आमच्या मनात आणला, त्यासाठी उपयुक्त अशी माहिती मिळेल असे केले, संगणकयंत्रासह आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि लिखाणासाठी स्फूर्ती दिली, अशी आमची श्रद्धा असल्याने त्या दृष्टीनेही 'संकलक' हाच शब्द योग्य होतो; म्हणूनच 'लेखक'ऐवजी 'संकलक' हा शब्द वापरला आहे. बाबांनीच हे चरित्र लिहून घेतलेले असल्याने खऱ्या अर्थाने याचे लेखक बाबाच आहेत.

## १५. आभार

आधी उल्लेख केल्याप्रमाणे प.पू. सौ. जीजी, बाबांचे चिरंजीव श्री. नंदू कसरेकर, बाबांचे भाचे श्री. पुरुषोत्तम माधवराव जोशी, गुरुवासी हरिभाऊ लांभाते, श्री. शशिकांत पंडित, श्री. श्रीकांत पंडित, श्री अशोक भांड आणि श्री. दिगंबर (बंडू) पोळ यांनी बरीच माहिती सांगितली. त्याकरता त्यांचे आभारी आहोत. बाबांच्या अगदी खाजगी वैयक्तिक जीवनातील प्रसंगही (बाबांना खाजगी जीवन उरले नव्हतेच म्हणा !) सौ. जीजींनी कोणताही आडपडदा न ठेवता सांगितले, त्याकरता त्यांचे कसे उतराई व्हावे, हेच समजत नाही. आम्ही मुंबईला रहातो आणि बाबांचे बहुतेक जुने भक्त इंदूरला आहेत; म्हणून इंदूरकर भक्तांवर जुन्या अन् वयस्कर भक्तांना परत परत भेटून, त्यांच्या स्मृतीला तजेला देऊन माहिती गोळा करण्याची जबाबदारी टाकायची, असे आम्ही ठरवले. त्यासाठी श्री. अशोक भांड हे स्वतःहून पुढे आले. त्यांनी प.पू. श्री अनंतानंद साईश, जुने भक्त आणि आश्रम यांची जमवता येईल तेवढी माहिती जमवून चांगल्या भाषेत लिहून दिली. श्री. दिगंबर (बंडू) कृष्णराव पोळ यांनीही जुने भक्त आणि भंडारे यांची सविस्तर माहिती लिहून दिली. आमच्या मुंबईतील साधकांनी लिखाणासाठी आम्हाला वेळ मिळावा, म्हणून पुष्कळ प्रयत्न केले. 'बाबांची सेवा' म्हणून त्यांनी ते केलेले असल्याने त्यांना नामोल्लेख आवडणार नाही, म्हणून तो करत नाही. असे असले, तरी पुढील काही जणांचा नामोल्लेख केल्यावाचून रहावत नाही, म्हणून तो करतो. संगणकीय अक्षरजुळवणी सर्वश्री राजेश सुरेश धनावडे, मनोज नारायण कुवेलकर आणि गणेश संजीव नाईक यांनी केली. पुनःपुन्हा मुद्रिते तपासण्याचे कंटाळवाणे काम सर्वश्री अरविंद परळकर, हेमंत भास्कर रानडे, डॉ. मिलिंद दत्तात्रेय खरे, संतोष आणि संदीप गजानन आळशी यांनी केले. या सर्वांनी रात्रीचा दिवस करून, प्रत्येकी दोन-तीन किलो वजन कमी करून, हे काम केल्यामुळे अमृतमहोत्सवाच्या वेळी हा ग्रंथ प्रसिद्ध होऊ शकला. ग्रंथाचे मुखपृष्ठ श्री. किशोर प्रभाकर करमरकर यांनी पुष्कळ कामे असूनही अगदी थोड्या वेळात सेवावृत्तीने करून दिले.

## १६. अपूर्ण

अनंताचे आणि शब्दातीताचे चरित्र थोड्या पानांत अन् शब्दांत लिहिण्याचा हा प्रयत्न आहे. बाबांच्या जीवनात अजून बरेच काही घडत आहे आणि आम्हालाही नवीन जाणिवा होत आहेत. तरीही, अशा अपूर्ण चरित्रातूनही साधकांना साधनेची स्फूर्ती मिळावी, अशी बाबांच्या चरणी प्रार्थना करून हे मनोगत पूर्ण करतो. – संकलक

## १७. श्री भक्तराजाय नमः ।

१९९१ साली आम्ही श्रीक्षेत्र नरसोबाच्या वाडीला बाबांबरोबर गेलो होतो. त्यांच्याबरोबर मोटारीमधून परततांना पुढील रचना सुचली. कांदळीला पोहोचल्यावर बाबांना ती वाचून दाखवली. रचना बाबांना आवडली. 'ब्रह्मर्षि नित्यानंद निवृत्तीरत्न' हे त्यांचे पूर्ण नाव तेव्हा आमच्या लक्षात नव्हते. ते त्यांनी सांगितल्यावर चाळीसाव्या ओवीत पालट करून ती ओवी नवीन लिहिली.

## विभाजित पहिल्या खंडाच्या आवृत्तीचे मनोगत

९ फेब्रुवारी १९९५ या दिवशी इंदूर येथे साजऱ्या झालेल्या बाबांच्या अमृतमहोत्सवाच्या प्रसंगी चरित्राची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. अमृतमहोत्सवाची धावपळ संपल्यावर चरित्रातील बराचसा भाग बाबांनी कु. सीमा गरुड यांच्याकडून वाचून घेतला. चरित्र ऐकतांना काही वेळा बाबांना गहिवरूनही येत होते. काही भाग वाचतांना बाबांनी नवीन माहिती सांगितली, तसेच काही प्रसंगांचे विश्लेषण केले. तो सर्व भाग चरित्राच्या सुधारित आवृत्तीत घ्यायचा होता.

अमृतमहोत्सवानंतर बाबांची प्रकृती बिघडत गेली आणि १७ नोव्हेंबर १९९५ रोजी बाबांनी देहत्याग केला. त्या नऊ महिन्यांच्या अवधीतील बहुतेक काळ आम्ही बाबांबरोबर होतो. त्या काळाविषयीची माहिती, देहत्यागाविषयीची सविस्तर माहिती आणि देहत्यागानंतर भक्तांना आलेल्या अन् अजूनही येत असलेल्या अनुभूती चरित्राच्या सुधारित आवृत्तीत घ्यायच्या होत्या. या सगळ्यामुळे सुधारित आवृत्तीची पृष्ठसंख्या पुष्कळ वाढू शकली असती. 'ग्रंथ नेहमी वाचकांच्या दृष्टीने सुटसुटीत आणि त्यांना परवडतील असे हवेत', असे बाबांनीच पूर्वी सांगितले होते. म्हणून चरित्रचे विषयांनुसार आता पाच खंडांमध्ये विभाजन केले आहे.

प्रस्तूत खंडामध्ये बाबांचे बालपण, कौटुंबिक जीवन, त्यांनी गुरुप्राप्तीपूर्वी केलेली साधना, गुरुपरंपरा, बाबांची शिष्यावस्था इत्यादी मुद्द्यांविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

## चरित्राच्या सुधारित आवृत्तीच्या प्रकाशनाचा<br>योग आताच येण्यामागील ईश्वरी नियोजन

बाबांनी ‘गुरुकृपायोग’ हा आध्यात्मिक उन्नतीचा जलद मार्ग दाखवला आहे. या मार्गाने साधना करणाऱ्या सनातनच्या साधकांची अल्पावधीतच जलद उन्नती होत आहे, याचे दर्शक म्हणजे सनातनचे पाच साधक काही वर्षांच्या साधनेनेच संतपदाला पोहोचले आहेत, तर काही साधकांची त्या दिशेने वाटचाल होत आहे. बाबांच्या चरित्राच्या सुधारित आवृत्तीच्या प्रकाशनाचा योग आताच येण्यामागे ईश्वरी नियोजन असण्याच्या आमच्या विचाराला पुढील विचारामुळे पुष्टी मिळाली. सनातनच्या संतपदाला पोहोचलेल्या साधकांना, तसेच इतरांनाही ईश्वरप्राप्तीच्या प्रवासात प्रत्येक प्रसंगावर कशा प्रकारे मात करत पुढे जायचे, हे शिकता यावे, तसेच संतपदाला पोहोचलेल्या साधकांकडे पाहून इतर साधकांनी कशा प्रकारे शिकायचे, हे त्यांना कळावे, यांसाठी बाबांचे चरित्र निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

## अपूर्ण

बाबांना विचारलेल्या पुढील गोष्टींचे विवरण द्यायचे त्यांनी टाळले. आता बाबांनी देहत्याग केलेला असल्याने त्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला कधीच मिळणार नाहीत.
१. एकदा रात्री १२ वाजता देवी कटोरा घेऊन आली. तिला बाबांचे गुरु प.पू. श्री अनंतानंद साईश म्हणाले, ‘दिनू को मांगने आई है । मैं नहीं दूंगा ।’

२. श्री श्यामसाईंनी देहत्याग केल्यानंतर बाबांनी केलेले ‘साई शाम जगी हे आले रे । आम्हा सोडून का ते गेले रे ।’ हे भजन प.पू. श्री अनंतानंद साईश बाबांना म्हणू देत नसत. प.पू. श्री अनंतानंद साइशांनी देहत्याग केल्यावर बाबा ते भजन परत म्हणायला लागले.

३. प.पू. श्री अनंतानंद साईश बाबांना म्हणायचे, ‘‘कब तक तू मुझे उतारेगा ?’’

४. प.पू. श्री अनंतानंद साईश यांच्या देहत्यागानंतर सापडलेल्या कमंडलूचे पुढे काय झाले ?

५. ‘‘सोमवार तेरे साथ जाएगा ।’’, असे प.पू. श्री अनंतानंद साईश बाबांना म्हणायचे. बाबांच्या या ग्रंथरूपी जीवनचरित्रातून बोध घेऊन काही जणांनी तरी साधनेला प्रारंभ करावा, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**